गडचिरोली
# महासागर जिल्हा विशेष
गुरूवार, दि. ३ जुलै २०२५


## अजय कंकडालवार यांच्याकडून कुमरे कुटुंबांना मदतीचा हात

**अहेरी :** तालुक्यातील आरेवाडा येथील ग्रा.पं. सदस्या नीलाबाई कुमरे यांचा मुलगा काही दिवसांपूर्वी दीर्घ आजाराने निधन पावला. आधीच निराधार व विधवा असलेल्या नीलाबाईच्या खांद्यावर दुःखाचा डोंगर कोसळला, आर्थिक परिस्थिती हलाखीच असल्याने घर चालवणे कठीण झाले होती. ही बाब स्थानिक कार्यकर्त्यांनी माजी जिप अध्यक्ष अजय कंकडालवार यांच्या निदर्शनास आणून दिली. कंकडालवार यांनी पुढाकार घेत नीलाबाई कुमरे यांना वैयक्ति स्वरूपात आर्थिक मदत केली. अजय कंकडालवार यांनी केलेल्या आर्थिक मदतीमुळे नीलाबाईच्या डोळ्यात अश्रू तळरले, पण ते होते आभारांचे व दिल्यास्याचे.

माजी जि.प. अध्यक्ष अजय कंकडालवार हे निवडणुकीपुरते लोकांमध्ये वावरणारे नेते, प्रत्येक सामान्य कुटुंबांच्या सुख-दुःखात सहभागी होणारे खरे जननेते म्हणून ओळखले जातात. ते तेरवी, वाढदिवस, लग्नकार्य, आजारपण, नैसर्गिक आपत्ती अशा प्रत्येक प्रसंगी परिवारातील सदस्यांसारखे सहभागी होता.

# भ्रष्ट अधिकाऱ्यांचे कोट्यावधी रुपये हवालाच्या माध्यमातून सफेद करवून देणारा तो दलाल कोण?

### मिळालेल्या संधीचा फायदा घेत ब्लॅक मनीवर व्याज कमावून अल्पावधी बनला कोट्याधिश

**विशेष प्रतिनिधी**
**देसाईगंज दि. २ :** आदिवासीबहुल अतिदुर्गम, अति. संवेदनशील गडचिरोली जिल्ह्याला लाभलेल्या तीन अभिशापामुळे कित्येक शासकीय अधिकाऱ्यांना विकास साधण्याच्या नावाखाली पाठविण्यात येते. मुळात यापैकी बऱ्याच अधिकाऱ्यांचा जुना रेकॉर्ड तपासण्यात आला असता गडचिरोली जिल्ह्यात बदली करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांपैकी बहुतांशी अधिकारी हे कुठल्या ना कुठल्या प्रकरणात एकतर वादग्रस्त ठरल्याचे आढळून येतात किंवा लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात अडकले असल्याचे आढळून येतात. यापैकी असणारांचा रेकॉर्ड खंगारुन आपले उखळ पांढरे करून घेण्यासाठी मागील काही वर्षांपासून सक्रिय असलेला देसाईगंज येथील तांदुळ माफिया जिल्ह्यातील भ्रष्ट अधिक. ऱ्यांचे कोट्यावधी रुपये हवालाच्या माध्यमातून सफेद करवून देण्यात मौलिक भुमिका बजावीत असल्यानेच अनेक भ्रष्ट अधिकारी त्याच्या संपर्कात येत असल्याचाच फायदा घेत ब्लॅक मनीवर व्याज कमावून अल्पावधीत कोट्याधिश बनलेला तो दलाल कोण? या चर्चेला आता शहरात चांगलेच उधाण येऊ लागले आहे.

आदिवासीबहुल नक्षलग्रस्त गडचिरोली जिल्ह्याची औद्योगिक नगरी म्हणून देसाईगंज शहराकडे पाहिल्या जाते.या शहरात विशेषता राईसमिल सोडुन कुठलेही मोठे उद्योग नसुन सुरु असलेला ए.ए. एनर्जी प्लँट देखील अखेरच्या घटका मोजत आहे. तब्बल साडे तीन हजार लोकांना प्रत्यक्ष तर किमान १५ हजार लोकांना अप्रत्यक्षरित्या रोजगार देणाऱ्या पोरवाल पल्प अँड पेपरमिलने गलिच्छ राजकारणाच्या षडयंत्राला बळी पडून केव्हाचीच नांगी टाकली आहे. अशात गडचिरोली जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात स्थानिक बेरा. जगारांना रोजगार उपलब्ध करून देणारे उद्योग म्हणून राईसमिल या औद्योगिक क्षेत्राकडे पाहिले जात आहे. वस्तुता या धंद्याच्या आड मागील काही वर्षांपासून अनेक गोरखधंदे सुरु असुन जिल्ह्यातील संबंधित अभिकर्ता संस्थेकडून भरडाईसाठी देण्यात आलेल्या धानाच्या बदल्यात तोच तांदुळ शासकीय गोदामात जमा करणे अनिवार्य असताना या प्रकरणात वारंवार दोषी आढळून आलेल्या एका तथाकथित प्रतिष्ठित राईसमिलर्सला वेळोवेळी अभय देण्यामागचे कारण आता चव्हाट्यावर येऊ लागले असुन जिल्ह्यात सुरु असलेल्या सिएमआर मिलींग घोटाळ्याचे प्रकरण भ्रष्ट अधिकाऱ्यांशी असलेल्या मधुर संबंधाशी जोडल्या जाऊ लागल्याने उशिरा का होईना बिंग फुटण्याची शक्यता आता वर्तवण्यात येऊ लागली आहे.

देसाईगंज शहरात गेली कित्येक वर्षांपासून सिएमआर मिलींग करणारे राईसमिलर्स कार्यरत आहेत. यापैकी काही राईसमिलर्स मानवी खाण्यास अयोग्य तांदळाचा पुरवठा करीत असल्याचा ठपका ठेवून संबंधित राईसमिलर्सना काळ्या यादीत टाकण्याची कारवाई करण्यात आली आहे. मात्र काही राईसमिलर्सनी शासनाच्या आदिवासी विकास महामंडळ व मार्केटिंग फेडरेशन कडुन भरडाई करीता धानाची उचल करून प्रती लॉट जवळपास १० लाख रुपये बँक गॅरन्टी शासना जमा करणे अनिवार्य असताना टिडीआर व बँक गॅरन्टीत हेराफेरी करून भ्रष्ट अधिकाऱ्यांचे कोट्यावधी रुपये हवालाच्या माध्यमातून सफेद करण्यात मौलिक भुमिका बजावल्यानेच चक्क शासन परिपत्रकाला हरताळ फासुन प्रसंगी शासनाची दिशाभूल करून संबंधित तांदुळ माफिया राईसमिलर्सला लाभ पोहचवण्यासाठी अनेकांनी आपली प्रतिष्ठा देखील पणाला लावली असल्याचे एकंदरीत सुरु असलेल्या कारवाई वरून स्पष्ट दिसून येत असल्याचे सांगीतले जात आहे.

दरम्यान याबाबत अधिक मा. हती जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता संबंधित तांदुळ माफियाचे लगतच्या छत्तीसगड, तेलंगणा, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश व बिहार राज्यातुन रिसायकलिंग राशनचा निकृष्ठ दर्जाचा दोन ते तीन वर्षे जुना असलेला व अत्यल्प दरात सहज उपलब्ध होत असलेल्या तांदुळ पुरवठादारांशी साटेलोटे असुन त्यांच्या माध्यमातून गडचिरोली जिल्ह्यात तांदुळ पुरवठा केल्या जात असल्याचे सांगीतले जात आहे. यामुळे जिल्ह्यातील अभिकर्ता संस्थेकडून उचल केलेल्या धानाची भरडाई करून शासनाला तांदुळ पुरवठा करणाऱ्या राईसमिलर्सनी किमान प्रती क्विंटल ०.८० युनिट वीज जाळली किंवा नाही? देण्यात आलेल्या धानाची भरडाई करून तोच तांदुळ जमा करण्यात येतो किंवा नाही? याबाबत कुठलिही शहानिशा न करता तसेच राईसमिल ते बेसगा. दाम वाहतूक भाड्यात प्रचंड गैरव्यवहार करून आर्थिक देवाणघेवाणीतुन काही अधिकाऱ्यांनी कोट्यावधी रुपये कमावल्याचे सांगीतले जात आहे. मिळवलेला पैसा पांढरा करण्यासाठी हवालाच्या माध्यमातून का होईना मार्गी लावण्यासाठी हवा असलेला दलाल अनवधानाने राईसमिलर्सच सापडल्याची संधी हेरून जबाबदार अधिकाऱ्यांनी भ्रष्ट मार्गाने मिळवलेले कोट्यावधी रुपये पांढरे करून वर्तमान स्थितीत सुरु असलेल्या सिएमआर मिलींग घोटाळ्यात चक्क दोषी आढळूनही वाचविचाच प्रयत्न केल्या जात असल्याने व याआधीही देसाईगंज येथील सदर राईसमिलर्सने कित्येक जबाबदार अधिकाऱ्यांचे कोट्यावधी रुपये हवालाच्या माध्यमातून सफेद करून दिले असल्याचे सांगीतले जात आहे. त्यामुळे अल्पवयात कोट्याधिश झालेल्या त्या राईसमिलर्सच्या संपत्तीची सखोल चौकशी केल्यास अनेक घबाड उघडकिस येण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. मात्र या प्रकरणाची गांभीर्याने चौकशी करण्यात येणार काय? असा प्रश्न आता उपस्थित केल्या जात आहे.

## आतापर्यंत मिळालेले पुरस्कार हीच संस्थेची उन्नती

**तालुका प्रतिनिधी**
**चामोर्शी दि. २ :** दि. गडचिरोली सहकारी पतसंस्था मर्यादित गडचिरोली या संस्थेची ३२ वर्षांपूर्वी संस्थापक खुशाल वाघरे यांनी स्थापना केली. विद्यमान संस्थाचालकांनी ग्राहकाचे हित लक्षात घेऊन संस्थेला बळकट करण्यात मोलाचे सहकार्य लाभले म्हणूनच संस्थेची उत्तरोत्तर प्रगती होत गेली. संस्थेला गेल्या काही वर्षांत मिळालेले अनेक पुरस्कार हीच संस्थेची उन्नती असल्याचे प्रशंसोद्गार संस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी काढले.

मान्यवरांचा सूरः नागरी सहकारी पतसंस्थेचा वर्धापण दिन



१ जुलै रोजी नागरी संस्थेचा ३१ वा वर्धापन दिन चामोर्शी शाखेत साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाला संजय चिंतलवार, आनंद लोंढे, बबन वडेट्टीवार, तारकल बांबोळे, रवींद्र खरवडे, राजीव मस्के, तर गडचिरोली नागरी संस्थेचे शाखा व्यवस्थापक भूषण रो. हनकर, लिपिक मंगेश तिवाडे, नितीन बोनगिरवार, महेश तुमपल्लीवार उपस्थित होते. सर्वप्रथम संस्थेचे संस्थापक खुशालराव वाघरे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी उपस्थित बबन वडेट्टीवार, रवींद्र खरवडे, तारकल बांबोळे यांनी संस्थेची प्रशंसा करीत भविष्यात संस्थेने अशीच यशस्वी वाटचाल सुरू ठेवावी, असे आवाहन केले.

या प्रसंगी शाखा व्यवस्थापक भूषण रोहनकर यांनी २१ जून २०२५ पर्यंत संस्थेत ठेवी १३४.३२ कोटी, गुंतवणूक ७२.७७ कोटी, वसूल भाग भांडवल ५.०९ कोटी, कर्ज वाटप १०३.९८ कोटी, राखीव निधी ३१.२० कोटी, वार्षिक उलाढाल ५६२.७७ कोटी तर एकूण सभासद ५१२४ असून आडीट 'अ' वर्ग असल्याची माहिती प्रास्ताविकातून दिली. यावेळी उत्कृष्ट ग्राहक म्हणून रवींद्र खरवडे, उत्कृष्ट ठेवीदार ग्राहक म्हणून बबन वडेट्टीवार तर उत्कृष्ट अभिकार्ता म्हणून राजेश्वर भोगावार यांचा सत्कार मान्यवरांचे हस्ते करण्यात आला.याप्रसंगी प्रमुख वसंत किन्हेकर, संजय चांपले, दामोदर तुमपल्लीवार, वसंत तुमपल्लवीवार, लिपिक विजय कोटगले उपस्थित होते. संचालन शाखा व्यवस्थापक प्रशांत ठाकरे, यांनी केले तर आभार विजय कोटगले यांनी केले. यावेळी संस्थेचे ग्राहक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सिरोंचात ३५ हजारांची दारू जप्त

**गडचिरोली :** सिरोंचा शहरातील वॉर्ड १६ मध्ये एका विक्रेत्याने विक्रीसाठी दारू आणल्याची माहिती मिळताच सिरोंचा पोलिस व मुक्तीपथ तालुका चमूने संयुक्तिक कृती करीत ३५ हजार १६० रुपयांची देशी विदेशी दारू जप्त केली.

सिरोंचा हे शहर जिल्ह्याच्या शेवटच्या टोकावर असलेली आहेत. तालुक्यात मोठ्या प्रमाणात अवैधरित्या दारूची तस्करी होत असते. सिरोंचा शहरातील वॉर्ड नंबर १६ मध्ये चार दारू विक्रेते सक्रिय आहेत. एका विक्रेत्याने तेलंगणा राज्यातून दारू आणली असल्याची गुप्त माहिती मिळाली. प्राप्त माहितीच्या आधारे पोलिस व मुक्तिपथ टीमने धाड टाकली असता चारचाकी वाहनात दारू आढळून आली. विक्रेता घटनास्थळावरून पसार झाला. यामध्ये ९० एम एल १५० विदेशी तसेच १४३ नग देशी दारू मिळून आली. असा एकूण ३५ हजार १६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या कारवाईमुळे शहरातील विक्रेत्यांमध्ये खळबळ निर्माण झाली आहे.

## ४१ मोकाट जनावरांची कोंडवाड्यात रवानगी

### गडचिरोली नगर परिषदेचे कारवाई



**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि. २ :** शहराच्या रस्त्यांवर, बाजारपेठांमध्ये आणि वर्दळीच्या अन्य ठिकाणी मोकाट फिरणाऱ्या गायी, बैल आणि इतर जनावरांचा प्रश्न गेल्या अनेक दिवसांपासून गडचिरोलीकरांना सतावत होता. हे जनावरे रस्त्यांवर अचानक आल्यामुळे अपघात होण्याची शक्यता असते, तर दुसरीकडे त्यांच्यामुळे वाहतुकीचा खोळंबा होत होता. नगर परिषदेचे कर्मचारी याआधीही अशा जनाव. रांना रस्त्यावरून पळवून लावण्याचा सातत्यानं प्रयत्न करत होते, मात्र ही तात्पुरती उपाययोजना असल्याने समस्येवर कायमस्वरूपी तोडगा निघत नव्हता.

या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम १९६५ नुसार गडचिरोली नगर परिषदेने मोकाट जनावरांविरोधात विशेष मोहीम हाती घेतली आहे. नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांनी विविध भागांमध्ये फिरून एकूण ४१ मोकाट जनावरे पकडून त्यांना खरपुंडी नाका येथील कोंडवाड्यात हलवले आहे. पुढेही हि मोहीम सुरूच आहे.

शहरातील मुख्य रस्त्यावर अनेक ठिकाणी मोकाट जनवारे ठाण मांडून बसलेली असतात. यामुळे अनेकदा अपघात होवून जीवितहानी होते. त्यामुळे जनावर मालकांनी आपली जनावरे मोकाट सोडू नयेत. ती योग्य प्रकारे बांध. न ठेवावीत, आणि शहराच्या सुव्यवस्थेसाठी सहकार्य करावे. पकडलेल्या जनावरांचे मालक १० दिवसांच्या आत कोंडवाडा शुल्क भरून जनावरे परत घेऊ शकतात. अन्यथा नियमानुसार गोशाळेत सुपूर्तगीरी केली जाईल. मोकाट जनावरे वाहतुकीस अडचण आणि अपघातांचेही कारण होत असल्याने नागरिकांनी या मोहिमेस सहकार्य करावे, असे आवाहन मुख्याधिकारी मुख्याधिक. ारी सूर्यकांत पिदुरकर यांनी केले आहे.

## विद्युत कर्मचाऱ्यांचे निदर्शन



**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि. २ :** महावितरण मंडळ कार्यालय गडचिरोली समोर विद्युत कर्मचारी? अभियंता, अधिकारी कृती समितीच्या वतीने बुधवार २ जुलै रोजी निदर्शने करून राज्यशासनाच्या खासगीकरण व इतर धोरणाचा निषेध करण्यात आला.

कर्मचाऱ्यांनी म्हटले आहे की, तिनही वीज कंपन्यातील विविध मार्गाद्वारे वाढत असलेले कंत्राटीकरण महावितरण कंपनीतील ३२९ उपकेंद्र खासगी ठेकेदारांना चालविण्यास देण्याकरिता काढलेली निविदा रद्द करणे, रिक्त पदे भरणे, वीज कामगारांना पेंशन मंजूर करणे, ४३ हजार कंत्राटी कामगारांना कायम करणे, महा. वितरण कंपनीच्या क्षेत्रामध्ये खासगी भांडवलदारांना वितरण परवाना न देणे यासह १४ मागण्यांसदर्भात महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रसिटी वर्कर्स फेडरेषन, सबऑर्डीनेट इंजिनिअर असा. सीएषन, महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत संघटन, महाराष्ट्र राज्य वीज कामगार कॉंग्रेस (इंटक), महाराष्ट्र राज्य स्वाभिमानी विद्युत वर्कर्स युनियन, तांत्रीक कामगार युनियन यांच्यावतीने २३ जुन ला आंदोलनांची नोटीस दिली होती. या आंदोलनाचा पहिला म्हणून आज निदर्शने करून शासनावि. रोधात घोषणाबाजी केली. शासनाने सदर मागण्याकडे लक्ष न दिल्यास ९ जुलै रोजी लाक्षणिक संप करण्याचा इशारा दिला आहे.

## सेवाभावी उपक्रमांनी माजी खा. डॉ. अशोक नेतेंचा वाढदिवस साजरा



**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि. २ :** भाजपच्या अनुसूचित जनजाती मोर्चाचे राष्ट्रीय महामंत्री तथा माजी खासदार डॉ. अशोक नेते यांचा वाढदिवस मंगळवारी अत्यंत उत्साहाच्या वातावरणात, विविध सेवाभावी उपक्रमांच्या माध्यमातून आणि लोकसहभागातून साजरा करण्यात आला.

सुरूवातीला गडचिरोलीकरांचे आराध्यदैवत सेमाना हनुमान मंदिरात पूजाअर्चा व आरती केल्यानंतर सेमाना गार्डनमध्ये 'एक पेड़ माँ के नाम' या संकल्पनेतून वृक्षारोपण करण्यात आले. विवेकानंद नगरातील मातोश्री वृद्धाश्रमात अन्नधान्य किटचे वाटप करण्यात आले. त्याचप्रमाणे मूकबधिर विद्यालय मुरखडा आणि कौशल्य निवासी मतीमंद विद्यालय बोदली येथे शैक्षणिक साहित्य वाटप करून विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवण्यात आले. तसेच महिला व बाल रुग्णालयात 'माणुसकीचा एक ध्यास' म्हणून अन्नदान करण्यात आले. सोमनाथ ज्योतिर्लिंग दर्शन सोहळ्यात सहभागी होऊन रुद्र पूजासुद्धा करण्यात आली.

यादरम्यान जिल्हा सामान्य रुग्णालयात गजानन गेडाम (रा. गोविंदपूर) या रानडुकराच्या हल्ल्यात जखमी झालेल्या व्यक्तीची डॉ. अशोक नेते यांनी जिल्हा सामान्य रुग्णालयात भेट घेऊन प्रकृतीची विचारपूस केली. त्याच ठिकाणी 'डॉक्टर्स डे' निमित्ताने जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. माधुरी किलनाके व अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक सतीशकुमार सोळंके यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यात आले.

## सिरोंचा सीसी रोड बांधकामाचे भूमिपूजन

**सिरोंचा :** स्थानिक बालाजी मंदिरासाठी ३० लाखा रूपये खर्चाच्या सीसी रस्त्याच्या बांधकामाचू भूमिपूजन न.पं.चे उपाध्यक्ष बबलू पाशा यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी सिरोंच. ातील प्रतिष्ठीत नागरिक तसेच सितापती गट्टू ब्रम्हानंद कोत्तागट्टू, इंदिरा, व्यंकटय्या पेंड्याला, सत्यनारायण दशरथी, अनिल रमेश, बोलमपल्ली रमेश, मोगलराज पेद्दापल्ली, जयेंद्र श्रीपती, संजय पेद्दापल्ली, अंकूल बक्कू, शंकर मार्गोनी, श्रीनिवास मार्गोनी, तुशार येंडे, सलाम शेख आदी उपस्थित होते.

## कोरेगाव तंटामुक्त समितीने केला सहा प्रकरणाचा निपटारा

**गडचिरोलीः** देसाईगंज तालुक्यातील कोरेगाव येथे महात्मा गांधी तंटामुक्त समितीच्या वतीने सोमवारी (दि.३०) आयोजित मासिक सभेमध्ये गावातील एकूण ६ प्रकरणाचा निपटारा करण्यात आला. यामध्ये प्रामुख्याने पतीपासून विभक्त होऊन माहेरी राहणाऱ्या प्रतिभा आकाश गहाणे व पती आकाश गहाणे यांच्यातील वादाचा आपशी समझोता करून व संबंधितांना योग्य समज देऊन वाद मिटविण्यात आला.

दाम्पत्यांमधील आपसी वादाचे सविस्तर वृत्त असे की, पती आकाश व पत्नी प्रतिभा गहाणे यांच्यात मागील अनेक दिवसांपासून वाद होता. त्यामुळे पत्नी प्रतिभा ही माहेरी राहत होती. दरम्यान, तंमुसच्या मासिक सभेत दाम्पत्यांना पाचारण करीत त्यांचे समूद. शन करण्यात आले. त्यांच्यातील वाद मिटवून आपसी समझोता करण्यात आला. या यशस्वी मध्यस्थीने पती आकाशने पत्नीला सोगत घेऊन जाण्याची तयारी दर्शविली. तंटामुक्तीच्या पुढाकाराने दोन्ही कुटुंबीयाचे आपसीने मनोमिलन यशस्वी झाले. त्यामुळे तंमूस पदाधिकाऱ्यांचे ग्रामस्थांकडून विशेष कौतूक करण्यात येत आहे.

# कृषी अधिकाऱ्यासह जिपचे सीईओ पोहचले बांधावर

### कृषी दिनानिमित्त अधिकाऱ्यांनी केली भात रोवणी



**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि. २ :** कै. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त 'कृषी दिन' साजरा करताना गडचिरोली जिल्हा परिषदेने नावीन्यपूर्ण उपक्रम राबवत अधिकारी थेट शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचले. जिल्हा परिषद गडचिरोली येथे आयोजित मुख्य कार्यक्रमात मान्यवरांच्या उपस्थितीत विविध उपक्रम पार पाडल्यानंतर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुहास गाडे यांनी सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांसह आरमोरी तालुक्यातील पाथरगोटा या गावात प्रत्यक्ष शेतात जाऊन भात रोवणी केली आणि शिंगाडा लागवडीचा अभ्यास केला.

मुख्य कार्यक्रमात अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र भुयार, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी प्रीती हिरळकर, कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख डॉ. किशोर झाडे, कृषी विकास अधिकारी आनंद पाल, जिल्हा मृदा चाचणी अधिकारी प्रदीप तुमसरे, तंत्र अधिकारी आनंद कांबळे तसेच कृषी विभागातील अनेक अधिक. ारी, कर्मचारी व शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

कार्यक्रमाची सुरुवात आनंद पाल यांच्या प्रास्ताविकाने झाली. त्यांनी कै. वसंतराव नाईक यांचे जीवनकार्य आणि कृषी दिनाचे महत्त्व सांगितले. यानंतर जिल्ह्यातील पीक स्पर्धा व कृषी पुरस्कार विजेत्या शेतकऱ्यांचा सत्कार करण्यात आला. 'गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा अनुदान' योजनेंतर्गत लाभार्थ्यांना धनादेश वितरण करण्यात आले. कृषी विषयक सखोल मार्गदर्शन सत्रात डॉ. लाकडे यांनी फळबाग व भाजीपाला लागवडीबाबत माहिती दिली, तर डॉ. झाडे यांनी भात व तुर लागवडीवर भर दिला. तुमसरे यांनी मृदा आरोग्य पत्रिकेचे महत्त्व पटवून दिले.

मुख्य कार्यक्रमानंतर अधिक. ारी पथक पाथरगोटा गावातील शेतकरी रामदास दोनाडकर यांच्या शिंगाडा लागवडीस भेट देण्यासाठी रवाना झाले. येथे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक पाहिल्यानंतर शेतकरी काशिनाथ दोनाडकर यांच्या शेतात भात रोपवाटिकेची पाहणी केली आणि स्वतः भात रोवणी केली. यानंतर शेतकऱ्यांसोबत शिंगाडा व भात लागवडीबाबत चर्चासत्र झाले.

या क्षेत्रभेटीत विनोद उद्धरवार (कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा), नितीन पाटील (उपअभियंता, यांत्रिकी), शेखर शेलार (उपमुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन), नारायण सरदार (कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग), चेतन हिवंज (उपमुख्य कार्यकारी अधिकारी, मनरेगा), रवींद्र कणसे (उपमुख्य कार्यकारी अधिकारी, पंचायत), कावळे (मुख्य लेखा व वित्त अधिकारी), मंगेश आरेवार (गटविकास अधिकारी आरमोरी), निलेश गेडाम तालुका कृषी अधिकारी आरमोरी, अशोक कुर्जेकर सहाय्यक गटविकास अधिकारी आरमोरी, संदीप नाकाडे मंडळ कृषी अधिकारी आरमोरी, कृष्णदास दोनाडकर कृषी अधिकारी पंचायत समिती आरमोरी, योगेश रणदिवे कृषी अधिकारी आरमोरी तसेच आरमोरी तालुका कृषी अधिकारी व पंचायत समिती कृषी विभाग अधिनस्त सर्व अधिकारी कर्मचारी व शेतकरी उपस्थित होते.

## दोनशे नागरिकांनी घेतला आरोग्य शिबिराचा लाभ

**धानोराः** तालुक्यातील रांगी ग्रामपंचायतीच्यावतीने नुकतेच विविध आजारांवर मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचार शिबिर स्थानिक समाज मंदिर येथे आयोजित करण्यात आले. या शिबिराला २०० नागरिकांनी लाभ घेतला. शिबिरात आरोग्य तपासणीसाठी ख्रिसतानंद ब्रम्हपुरी येथील कान, नाक, घसा, कॅन्सर तज्ज्ञ डॉ. नारिंगे, दि. सावंत एमबीबीएस नागपुरचे डॉ. आशिष, जनरल सर्जन मेडिसिनी नागपूरचे डॉ. जुमनाके, फार्मसी विलास चौधरी, अजित महाजन यांनी आरोग्य तपासणी करून औषधोपचार केला. शिबिराचे उद्‌घाटन सरपंच फालेश्वरी गेडाम, कृउबासचे सभापती शशिकांत साळवे, उपसरपंच नुरज हलामी आदी उपस्थित होते.


**उत्तराबधिकारी प्रमाणपत्राबद्दल जाहिरनामा**

पेशी तारीख - ०१/०८/२०२५

नि.क्र. : ७

**कोर्ट विद्यमान श्री. एन.ए. पठाण, २ रे दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), गडचिरोली**

किरकोळ दिवाणी मामला क्रमांक -१२२/२०२५

**अर्जदारः** १) श्रीमती सरीता मनोज कुंभारे, वय ४६ वर्षे, धंदा-नौकरी, २) पलक मनोज कुंभारे, वय २० वर्षे, धंदा-शिक्षण, ३) आयुष मनोज कुंभारे, वय १६ वर्षे, धंदा- शिक्षण ४) श्रीमती देवकाबाई निलकंठ कुंभारे, वय ८३ वर्षे, धंदा-काही नाही, सर्व रा. अयोध्यानगर, वार्ड क्र. १५ गडचिरोली. ता. जि. गडचिरोली.

-: विरूध्द :-

**गैरअर्जदार :-** निरंक

सर्व आम जनतेस याद्वारे सुचित करण्यात येते की, मनोज निलकंठ कुंभारे दिनांक १९/०५/२०२५ रोजी मृत्यू झाला. त्यांचे उत्तराधिकारी प्रमाणपत्र मिळण्यासाठी वरील अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज केलेला आहे. उत्तराधिकारी प्रमाणपत्र मिळण्यासाठी वरील अर्जदारांनी केलेल्या अर्जावर कोणाची उजर वा हरकत असल्यास त्यांनी जाहीरनामा नोटीस प्रकाशित झाल्यापासून एक महिण्यांचे आत त्यांनी स्वतः किंवा आपले वकिलामार्फत वा योग्य मुख्यत्यारामार्फत आपली लेखी उजर वा हरकत दाखल करावी, अन्यथा नदूनंतर हे न्यायालय सदरहू अर्जदारांचा लागलीच पुरावा घेवून उत्तराधिकारी प्रमाणपत्र मिळण्यासाठी केलेल्या अर्जावर योग्य तो निर्णय देईल.

सबब जाहीर नोटीस दिनांक २४ जून २०२५ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**आदेशान्वये**
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, (वरिष्ठ स्तर )**
**गडचिरोली**

**उत्तराबधिकारी प्रमाणपत्राबद्दल जाहिरनामा**

पेशी तारीख - १७/०७/२०२५

निशाणी क्रमांक : ०७

**कोर्ट विद्यमान श्रीमती व्ही.आर. मालोदे, सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), गडचिरोली यांचे न्यायालयात**

एम.जे.सी. क्रमांक -१०९/२०२५

ज्यापेक्षा मय्यत गौतम गंगाराम गेडाम हे तारीख २२ माहे सप्टेंबर सन २०१३ रोजी हे मरण पावले असुन त्यांचे वारसान अनुक्रमे-

**अर्जदारः** १) श्रीमती पुष्पा गौतम गेडाम, वय ५७ वर्षे, धंदा-घरकाम, २) राणी गौतम गेडाम, वय २९ वर्षे, धंदा-नौकरी, दोन्ही रा. रेव्हेन्यू कॉलनी वार्ड नं. १५, चंद्रपूर रोड गडचिरोली, ता. जि. गडचिरोली.

-: विरूध्द :-

**गैरअर्जदार :-** निरंक

वरीज अर्जदार यांनी या कोर्टास सदरहू मय्यत गौतम गंगाराम गेडाम यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज केला आहे.

त्यापेक्षा सदरहू मय्यताचे कोणीही नव्हे असे कोणास समजाविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिण्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवावे, आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणीही योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार ह्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीस दिसल्यास त्यांना सदरहू मय्यत गौतम गंगाराम गेडाम यांचे उत्तराधिकारी प्रमाणपत्र देईल.

सबब जाहीर नोटीस दिनांक १३ जून २०२५ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सहा. अधिक्षक**
**सह दिवाणी व फौजदारी न्यायालय**
**गडचिरोली**


PNINO-MAHAMAR 2010585 **महासागर गडचिरोली** मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, एकदा मार्केट, चामोर्शी रोड, गडचिरोली येथे प्रकाशित केले. संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१/९९२२९७००२३ स्थानिक संपादक नरेंद्र माहेश्वरी फोन ९९२२९७००३६/०७१३२२३२७७३ (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबावदारी यांचेवर राहिल.)

## कोंडाळात भारतीय जनता पार्टीतर्फे ‘मन की बात’

**देसाईगंजः** भारतीय जनता पार्टी तालुका देसाईगंज मंडळ (ग्रामीण) यांच्यावतीने रविवारी (दि.२९) सकाळी ११ वाजता कोंढाळा येथील ग्रामपंचायत समाज मंदिरात येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ‘मन की बात’ कार्यक्रमाचे विशेष आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला आरमोरी विधानसभा क्षेत्राचे माजी आ. कृष्णा गजबे यांची प्रमुख उपस्थिती होती. पंतप्रधानांचे विचार ऐकण्यासाठी कोंढाळा आणि परिसरातील भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते, पदाधिकारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पंतप्रधानांनी ‘मन की बात’मधून देशातील विविध विषयांवर केलेले मार्गदर्शन सर्वांनी लक्षपूर्वक ऐकले. यावेळी माजी आ. कृष्णा गजबे यांनी ‘मन की बात’ कार्यक्रमाचे महत्त्व आणि पंतप्रधानांच्या दूरदृष्टीबद्दल उपस्थितांना माहिती दिली. त्यांनी असेही सांगितले की, ‘मन की बात’ हा जनतेशी थेट संवाद साधण्याचा एक प्रभावी माध्यम आहे. यातून पंतप्रधानांना सर्वसामान्य लोकांचे विचार आणि सूचना थेट समजतात. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी देसाईगंज तालुका भारतीय जनता पार्टी (ग्रामीण) च्या कार्यकर्त्यांनी सहकार्य केले.

# सिरोंचातील ज्वलंत समस्यांवर उपाययोजना करा

## उच्चस्तरीय समिती गठित कराः अन्यथा ताला ठोकोचा इशारा



**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि. २ :** सिरोंचा तालुक्यातील तालुक्यातील अनेक समस्या दीर्घकाळापासून प्रलंबित असल्याने जनतेच्या दैनंदिन जीवनावर परिणाम होत आहे. याबाबत प्रशासनाचे अने. कदा निवेदन, विनंतीच्या माध्यमातून लक्ष वेधण्यात आले. मात्र, ठोस कार्यवाही झाली नाही. त्यामुळे तालुक्यातील प्रचंड नारा. जी व असंतोषाचे वातावरण आहे. त्यामुळे तालुक्यातील ज्वलंत समस्यांवर उपाययोजना करण्यासाठी उच्चस्तरीय समिती गठित करा. अन्यथा, काँग्रेसच्या नेतृत्वात विविध शासकीय कार्यालयांना ताला ठोकण्याचा इशारा काँग्रेसचे तालुकाध्यक्ष सतीश जवाजी यांनी तहसीलदारामार्फत जिल्हाधिकाऱ्यांना पाठविलेल्या निवेदनातून दिला आहे.

सिरोंचा तालुक्यातील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३५३ सी या मार्गाची अत्यंत दैनावस्था झाली आहे. खड्डेमय रस्त्यांमुळे राज्य परिवहन महामंडळाच्या बसेस पूर्णपणे बंद आहेत. याचा फटका शालेय विद्यार्थी, रुग्ण, सामान्य नागरिक यांना खासगी वाहनांद्वारे जिवावर उदार होऊन प्रवास करावा लागत आहे. अपघातांची शक्यता कायम आहे. शासकीय यंत्रणा याकडे दुर्लक्ष करत असल्याचे चित्र आहे. आरोग्य सुविधांचा अभाव हा आणखी एक गंभीर विषय आहे. सिरोंचा ग्रामीण रुग्णालयात मागील ४ ते ५ महिन्यांपासून वैद्यकीय अधिकारीच नाही. या कारणामुळे प्राथमिक उपच. ारांपासून शवविच्छेदनपर्यंत सर्व सेवा विस्कळीत झाल्या आहेत. नुकत्याच एका घटनेत शवविच्छेदनासाठी डह्क्टरांना चक्क चंद्रपूरहून बोलावण्यात आले, ही बाब अत्यंत लाजिरवाणी असून यामुळे आरोग्य विभागाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होते. आपत्कालीन परिस्तितीत गर्भावती महिला, स्नेक बाईट रुग्ण, बाल रुग्ण, अपघातग्रस्त रुग्णांना डॉक्टराअभावी तेलंगणा राज्यात रेफर केले जात आहे. दुसरीकडे बीएसएनएल नेटवर्कची स्थिती ढासळलेली आहे. बँक व्यवहार, सरकारी ऑनलाईन सेवा, ई-गव्हर्नन्सचे उपक्रम, आरोग्य सेवा, शैक्षणिक उपक्रम या सर्व गोष्टी पूर्णपणे ठप्प पडतात. त्यामुळे विविध कामांसाठी नागरिकांना तालुक्याबाहेर जावे लागते, ज्यामुळे आर्थिक, मान. सिक व शारीरिक त्रास वाढला आहे.

### तालुक्यात ७० टक्के गावातील समस्या

तालुक्यातील सुमारे ७० टक्के गावांमध्ये दररोज वीज पुरवठा खंडित राहतो. त्यामुळे शैक्षणिक, आरोग्य, शेती आणि पाणीपुरवठा यावर मोठा परिणाम होत आहे. वरील सर्व समस्यांमुळे सामान्य जनतेत अस्वस्थता निर्माण झाली असून, प्रशासनावरचा विश्वास डळमळीत झाला आहे. या सर्व समस्यांवर तातडीने कार्यवाहीसाठी पुढील १० दिवसात उच्चस्तरीय समिती गठित करण्यता यावी. या समितीद्वारे सर्व संबंधित विभागांचे कार्यस्थळी निरीक्षण करून उपाययोजना ठरवण्यात याव्यात व त्याची अंमलबजावणी निश्चित कालमर्यादेत करण्यात यावी. अन्यथा, काँग्रेसच्या नेतृत्वात बीएसएनएल कार्यालय, महावितरण कार्यालय व ग्रामीण रुग्णालयाला ताला ठोकण्याचा इशारा काँग्रेसचे तालुकाध्यक्ष सतीश जवाजी यांनी तहसीलदारांमार्फत जिल्हाधिकाऱ्यांना दिला आहे.

# उन्हाळी धान केंद्रांना मुदतवाढ द्या

## उशिरा खरेदीमुळे समस्याः १५ दिवसांची मुतवाढ देण्याची मागणी



**शहर प्रतिनिधी**
**आरमोरी दि. २ :** आधारभूत उन्हाळी धान खरेदी केंद्रांवर धार खरेदीची मुदत ३० जूनपर्यंत होती. मात्र, अद्यापही खरेदी केंद्रात नोंदणी केलेल्या जवळपास तालुक्यातील ५०० च्यावर शेतकरी धानविक्रीपासून वंचित आहेत. त्यामुळे धान खरेदीला १५ दिवसांची मुदतवाढ देण्यासह उद्दिष्ट वाढविण्यात यावे, अशी मागणी आ. रामदास मसराम यांनी राज्याचे अन्न व नागरी पुरवठा राज्यमंत्री योगेश कदम यांच्याकडे निवेदनातून केली आहे.

सिंचन सुविधा असलेल्या अनेक शेतकऱ्यांनी तसेच अनेक शेतकऱ्यांनी इटियाडोह प्रकल्पाच्या पाण्याने उन्हाळी धान पीक हाती घेतले होते. परंतु, आधारभूत धान खरेदी केंद्र उशिरा सुरू झाल्यामुळे बहुतेक शेतकऱ्यांनी घरी जागा नसल्यामुळे रस्त्यावर झाकून ठेवलेले धान अवकाळी पावसात भिजल्या गेले. यात अनेक शेतकरूयांचे नुकसान झाले.

आरमोरी येथील खरेदी विक्री केंद्रावर शेतकरूयांनी धानविक्रीसाठी आणले. खरेदीचा कालावधी ३० जूनपर्यंत होता. जवळपास ९०० च्या वर शेतकरूयांनी संस्थेच्या केंद्रावर नोंदणी केली असता यातील केवळ ४०० शेतकऱ्यांच्या धानाची खरेदी झाली. पण, मागील ५०० शेतकरूयांचे ७० ते ८० ट्रॅक्टर भरलेले धान मागील काही दिवसांपासून केंद्रासमोर उभ्या आहेत. परिणामी, ५०० च्या वर शेतकरी धानविक्रीपासून वंचित आहेत. खरेदी कालावधीमध्ये अह्नलाइन पोर्टलवर अनेक तांत्रिक अडचणी येत असल्याने खरेदी केंद्रावर विक्री केलेल्या बऱ्याचशा शेतकऱ्यांचे धानाचे बिल बनविणे मुदतीच्या आत होऊ शकले नाही. ट्रॅक्टर्सच्या रांगाच रांगा आरमोरी खरेदी विक्री संस्थेच्या पळसगाव उपकेंद्र व आरमोरी बर्डी केंद्रावर असून, मुद. तीचे आत धानाचा काटा होणे शक्य नाही. यावेळी अनेक धान भरलेले ट्रॅक्टर केंद्रासमोर निदर्शनास आले. यामुळे प्रशासनाप्रती शेतकऱ्यांमध्ये रोष बघता उन्हाळी धान खरेदी केंद्रांना १५ दिवसांची मुदतवाढ व उद्दिष्ट वाढवून देण्याची मागणी आ. मसराम यांनी राज्याचे अन्न व नागरी पुरवठा राज्य मंत्री यांच्याकडे निवेदनातून केली. यावेळी मंत्री महोदयांनी आमदारांना सकारात्मक प्रतिसाद देत मुदवाढीसह उद्दिष्ट वाढ करण्याचे आश्वासन दिल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

### आमदारांनी दिली केंद्राला भेट

शेतकऱ्यांची समस्या लक्षात घेत धान खरेदीचा कालावधी वाढवून मुदतवाढ द्यावी. तसेच खरेदी केंद्राचे उद्दिष्ट संपल्याने आधारभूत धान खरेदी केंद्र बंद पडली आहे. यामुळे शेतकरी अडचणीत सापडला असून, १५ दिवसांची मुदतवाढ व उद्दिष्ट वाढविण्यासाठी पाठपुरावा करावा, अशी मागणी तालुक्यातील वंचित शेतकऱ्यांनी आ. रामदास मसराम यांच्याकडे केली होती. याची दखल घेत आमदारांना स्वतः आरमोरी बर्डी येथील खरेदी विक्री केंद्राला भेट देत शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेतल्या.

# शाळेच्या भौतिक सुविधेत सुधारणा करा

## आ. रामदास मसराम यांचे निर्देशः भाकरोंडी शाळेत पालक मेळावा



**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि. २ :** ज्या विश्वासाने पालक शासकीय आश्रमशाळेत मुलांना दाखल करतात, त्या विश्वासाला सार्थकी लावण्याची जबाबदारी ही शिक्षक व शाळेवर असते. पालकांच्या मनात आपल्या मुलांप्रती असलेल्या उज्ज्वल भविष्याला साकार करण्यासाठी आश्रम शाळेतील शिक्षकांनी प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी कठोर मेहनत घेतली पाहिजे. तसेच शाळेच्या भौतिक सुविधेत सुधारणा केली पाहिजे, असे निर्देश आ. रामद. ास मसराम यांनी केले.

आरमोरी तालुक्यातील भाकरोंडी येथील शासकीय आश्रमशाळेत आयोजित करण्यात आलेल्या प्रवेशोत्सव व पालक मेळाव्याच्या कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. यावेळी विशेष अतिथी म्हणून प्रकल्प कार्यालयाचे सहाय्यक लेखा अधिकारी सोमकर, तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मिलिंद खोब्रागडे, सामाजिक कार्यकर्ते दिलीप घोडाम, मुख्याध्यापक डोंगरे, गणविर, नरेश टेंभुर्णे, पोलिस पाटील लालाजी टेंभुर्णे, नानाजी ऊईके, मेश्राम, फुले, अधीक्षक बोरकर, बारसागडे, भास्कर राऊत, लिलेश्वरी निनावे, गेडाम उपस्थित होते.

यावेळी आ. मसराम यांच्या हस्ते बारावीच्या परीक्षेत आश्रम शाळेतून प्रथम आलेल्या मुलीचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर आमदार मसराम यांनी शाळेची पाहणी केली. गेवर्धा येथील एकलव्य शाळेचे विद्यार्थी भाकरोंडी शाळेत स्थानांतरीत केले. आश्रमशाळेतील २५० विद्यार्थी एकत्र आल्याने जवळपास ५१० विद्यार्थ्यांना भौतिक सुविधा पाहिजे त्या प्रमाणात मिळत नसल्याची बाब लक्षात आली. यासंबंधी आपण विधानसभेत प्रश्न उपस्थित करण्याचे आश्वासन त्यांनी पाल. कांना दिले.

# हजारो भाविकांनी घेतले जगन्नाथ रथयात्रेचे दर्शन

**तालुका प्रतिनिधी**
**चामोर्शी दि. २ :** आषाढ शुद्ध द्वितीयेला कृष्णगार (इस्कॉन चामोर्शी) राधास्वामी मंदिर कमिटीच्यावतीने भगवान जगन्नाथ यांची रथयात्रा राधास्वामी मंदि. रातून काढण्यात आली. त्यावेळी हजारो भाविक सहभागी होत अनुभवला अद्भुत सोहळा प्रत्यक्ष अनुभवला.

राधास्वामी मंदिरात जगप्रसिद्ध भगवान जगन्नाथ, बलराम आणि सुभद्रा यांच्या प्रतिमा सुशोभीत रथावर विरा. जमान करून हरणघाट येथील संत मुर्लीधर महाराज, बल्लारशा येथील लक्षणसिंग चंदेल, आष्टी येथील कोहळे परिवार व राम सरकार गुरुजींच्या उपस्थितीत पूजा अर्चा करण्यात आली. त्यानंतर हजारो भाविकांनी रथ ओढित श्री श्री राधास्वामी मंदि. रातून काढला. शहरातून मार्ग भ्रमण करीत जुन्या तहसील कार्यालयापासून कृष्णनगर येथून मंदिरात परत आणण्यात आले. या रथ यात्रेची पारंपारिक प्रथाम असून जगन्नाथाचे दर्शन घेतल्यास व रथ ओढल्यास सौभाग्य प्राप्त होत असून रथ यात्रेत सहभागी झाल्यास मोक्ष प्राप्तीचा मार्ग मोकळा होतो, अशी आख्यायिका आहे. परिणामी या रथ यात्रेला फार मोठे महत्त्व असल्याने हजारो महिला-पुरुष भाविकांनी या यात्रेत सहभागी होत दर्शन घेतले. या यात्रेदरम्यान जगदीश राय, ताकदास, नटराज, बिजराज, सुनील बोमनवार, रवींद्र येग्लोपवार, यासह पुजारी हरिद. ास माझी, अदभूत कृष्ण आद उपस्थित. या रथ यात्रेसाठी भाविकांची गर्दी उसळली होती.



### पारंपरिक विधी पडल्या पार

रथयात्रेला शुक्रवारी (दि. २७) सकाळी मोठ्या उत्साहात प्रारंभ झाला. हजारो भक्त या सोहळ्यासाठी या ठिकाणी जमले आहेत. भगवान जगन्नाथ आणि त्यांची भावंडं बलभद्र आणि देवी सुभद्रा या देवी-देवतांना स्थावर विराजमान करण्यात आले. पारंपरिक विधी पार पाडल्यानंतर रथ ओढण्यास सुरुवात झाली.

## ज्ञानेश्वर पायन पुरस्काराने सन्मानित



**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि. २ :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्यक विभागाच्या वतीने २०२३-२४ या वर्षाचे साहित्य रत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे राज्यस्तरीय पुरस्कार नुकताच मुंबई येथे आयोजित कार्यक्रमात वितरित करण्यात आले. यात जिल्ह्याचे सामाजिक कार्यकर्ते ज्ञानेश्वर इस्तारी पायघन यांच्या सामाजिक कार्यातील योगदानाबद्दलत्यांना समाजभूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

मुंबई येथील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित या कार्यक्रमात राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, समाजकल्याण मंत्री संजय शिरसाठ यांच्या हस्ते ज्ञानेश्वर पायघन यांना समाजभूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. ज्ञानेश्वर पायघन हे विविध सामाजिक उपक्रम राब. वित आले आहे. या माध्यमातून गोरगरीब, गरजूंच्या मदतीसाठी ते नेहमीच धावून जातात. त्यांच्या याच कार्याची दखल घेत त्यांना वैयक्तिक समाजभूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. त्यांना प्राप्त पुरस्काराबद्दल जिल्हा प्रशासनाच्या वतीने जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांचा विशेष सत्कार करण्यात आला. यशाबद्दल सर्वच क्षेत्रातून कौतुक केल्या जात आहे.

## वंचित बहुजन आघाडीचे निवडणुकीवर मंथन



**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि. २ :** वंचित बहूजन आघाडी पूर्व विदर्भ कमिटीची आढावा बैठक नुकताच गडचिरोली येथे पार पडली. या बैठकीत आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसंदर्भात चर्चा घडवून आणण्यात आली. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून राज्य कार्यकारिणी सदस्य कुशल मेश्राम, महिला निरीक्षक तनुजा रायपुरे, पूर्व विदर्भ संयोजक मुरलीधर मेश्राम, विवेक हाडके, भगवान भौंडे, प्रफुल मानके, बाळू टेंभुर्णे आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती.

आगामी पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगर परिषद व नगर पंचायतीच्या निवडणूक पूर्ण ताकदीने लढविण्याचा निर्णय घेत पदाधिकारी, कार्यकत्यांनी संघटन मजबूत करण्यासाठी जोमाने कामाला लागण्याचे आवाहन करण्यात आले. बैठकीला वंचित आघाडचे जिल्हाध्यक्ष प्रा. प्रशांत देव्हारे, जिल्हा महासचिव मंगलद. ास चापले, राजरतन मेश्राम, प्रेमानंद वालदे, भीमराव शेंडे, रघुनाथ दुधे, विकास मेश्राम, जिल्हा कार्यकारिणी सदस्य हंसराज बढोले, सोनलदीप देवतळे, उषा निमगडे, प्रशांत भैसारे, प्रेम जगझाके, विनोद मेश्राम, अशोक मेश्राम आदींसह जिल्ह्यातील पदा. धिकारी व बहूसंख्य कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. प्रशांत देव्हारे यांनी केले. संचालन हंसराज बढोले यांनी केले, तर आभार राजरतन मेश्राम यांनी मानले.

## वीज बिघाड शोधताना कर्मचाऱ्यांची कसरत

**अहेरी :** पावसाळ्यात वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी वीज कर्मचाऱ्यांची धावाधाव होते. कुठे बिघाड आला, यासाठी रात्रीच्या वेळी देखील पेट्रोलिंग करावी लागते. विशेष म्हणजे, विद्युत कर्मचाऱ्यांना भर पावसात १५-२० किमी जंगलातून पेट्रोलिंग करीत बिघाड शोधावा लागतो.

आलापल्ली उपविभागांतर्गत येणाऱ्या जिमलगट्टा वीज वितरण उपकेंद्रावरून जवळपास ८० गावांना वीजपुरवठा सुरू आहे. या ८० गावांना वीजपुरवठा करण्यासाठी जिमगट्टा, रेपनपल्ली, उमानूर असे तीन ११ केव्ही लाइन फिडर आहेत. या तिन्ही फिडरची लाइन जिमगट्टावरून ३५ किमी अंतर. ापर्यंत पूर्णपणे जंगलातून गेलेली आहे.

## शेतकऱ्यांनी गिरवले बोर्डो मिश्रणाचे धडे



**तालुका प्रतिनिधी**
**चामोर्शी दि. २ :** केवळरामजी हरडे कृषी महाविद्यालय चामोर्शी अंतर्गत ग्रामीण उद्योजकता जागृती विकास योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांनी चित्तरं. जनपूर येथे शेतकऱ्यांसाठी बोर्डो मिश्रण तयार करण्याचे प्रात्यक्षिक आयोजित केले. या कार्यक्रमात सरपंच सोनी मंडल यांच्यासह अनेक शेतकरी व कृषिमित्र सहभागी झाले होते.

सदर उपक्रम कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आदित्य कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. यावेळी प्रा. प्रलय झाडे, प्रा. पवन बुधबावरे, प्रा. छबिल दुधबळे, प्रा. उषा गजभिये, मृदशास्त्राचे प्रा. महेंद्रकुमार लिल्हारे, वनस्पती रोगशास्त्र विभागाच्या सहाय्यक प्रा. पल्लवी भांडेकर यांच्या मार्गदर्शनात विद्यार्थी कृष्णा डाकोरे, मीलन बांबोळे, अथर्व बोरकर, शुभम धकाते आणि कुणाल चलाख यांनी मिळून बोर्डो मिश्रण तयार करण्याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक शेतकऱ्यांना दाखविले. चुना (१ किलो), मोरचूद (कॉपर सल्फेट १ किलो) आणि पाणी (१०० लिटर) या प्रमाणात तयार केले जाणारे हे मिश्रण एक प्रभावी बुरशीनाशक असून, पिकांवरील बुरशीजन्य रोग नियंत्रणासाठी फार उपयुक्त ठरते.

प्रात्यक्षिकानंतर मिश्रणाची विविध प्रमाणातील फवारणी सरपंच मंडल यांच्या शेतातील झाडांवर करून दाखवण्यात आली. झाडांचे संरक्षण आणि संवर्धन कसे करावे, यावरही मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी यावर आधारित प्रश्नोत्तर सत्रही घेतले. बोर्डो मिश्रण तयार केल्यानंतर ताबडतोब वापरणे आवश्यक असते. कारण, वेळ गेल्यास त्याचा प्रभाव कमी होतो. या उपक्रमातून शेतकऱ्यांना सेंद्रिय व पारंपरिक रोगनियंत्रणाच्या उपायांबाबत मोलाची माहिती मिळाली. विद्यार्थ्यांच्या ज्ञानाचा प्रत्यक्ष शेतीशी संपर्क साधण्याचा उत्कृष्ट अनुभव मिळाला.

# गोटाटोलावासीयांची चिखलातील रस्त्यावरून फरफट अद्यापही कामयच

## उपविभागीय अधिकाऱ्यांचे आश्वासनही विरले हवेतः नागरिकांती प्रशासनाप्रती संताप



**तालुका प्रतिनिधी**
**एटापल्ली दि. २ :** तालुक्यातील अतिदुर्गम भागात मोडत असलेल्या गोटाटोला गावातील नागरिक अजूनही पक्क्या रस्त्यासाठी तडफडत आहेत. काही दिवसांपूर्वी गावकऱ्यांनी ‘आमच्या गावात रस्ता कधी होणार जी’ असा सवाल करत प्रशासन आणि लो. कप्रतिनिधींना जाब विचारला होता. यावर उपविभागीय अधिकारी नमन गोयल यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हाधिकाऱ्यांना पत्र पाठवून पावसाळ्यापूर्वी उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, कोणतीही कारवाई न झाल्याने यंदाही पावसाळ्यात ग्रामवासीयांची चिखलमय रस्त्यावरुन फरफट सुरूच आहे.

गोटाटोला हे सरखेडा ग्रामपंचायतीच्या हद्दीत असलेले एक छोटे आदिवासी गाव असून, सुमारे २९ कुटुंबे येथे वास्तव्यास आहेत. हे गाव मुख्य रस्त्यापास. ून साधारणपणे ३ किमी अंत. रावर आहे. मात्र, पक्क्या रस्त्याअभावी हा ३ किमीचा प्रवास आजही फक्त पायवाटेने किंवा बैलगाडीच्या साहाय्याने करावा लागतो. ग्रामस्थ अनेकदा ग्रामपंचायत, तालुका प्रशासन, जिल्हा प्रशासन आणि लोकप्रतिनिधींकडे मागणी करून थकले आहेत. मात्र, केवळ आश्वासनाच्या पलिकडे काहीही घडलेले नाही. याआधी देखील गावकऱ्यांनी आवाज उठवला होता. अधिकाऱ्यांना निवेदने घेतली, प्रत्यक्ष भेटीचे आश्वासन दिले. पण, ते केवळ कागदावरच राहिले. आता पावसाळ्यात परिस्थिती आणखी बिकट झाली आहे. मुलांना शाळेत जाण्यासाठी चिखलातून वाट काढावी लागत आहे. रुग्णांना दवाखान्यात पो. होचवणे म्हणजे ग्रामस्थांसाठी मोठे युद्धच आहे. कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उदभवल्यास हा रस्ता जीवघेणा ठरू शकतो, हे याआधी अनेकदा अनुभवले गेले आहे. प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी आमच्या व्यथेकडे लक्ष न दिल्यास रस्त्यावर उतरून आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

### लोकप्रतिनिर्धीचा विकास फक्त घोषणांपुरता

लोकप्रतिनिर्धीना केवळ निवडणुकीपुरताच ग्रामस्थांची आठवण येत असल्याचा आरोप होत आहे. प्रचाराच्या काळात गगनभेदी भाषणं करून विकासाचे गाजावाजा करणारे हेच लोकप्रतिनिधी आता गप्प आहेत. त्यांच्या निषक्रयतेमुळे गोटाटोला आजही रस्त्याविना, आरोग्य सेवेशिवाय आणि मूलभूत सुविधांपासून वंचित आहे. शासनाच्या आणि लोकप्रतिनिर्धीच्या या कुंभकर्णी झोपेने गोटाटोल्यासारखी गावे नेहमीच विकासाच्या वळणावर थांबलेलीच राहतील का? असा गंभीर प्रश्न आजही कायम आहे.

## सावतेली समाजातर्फे प्रा. बारसागडे यांचा सत्कार



**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि. २ :** सामाजिक कार्यकर्ते प्रा. रमेश बारसागडे यांची भारतीय जनता पार्टीच्या गडचिरोली जिल्हाअध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल सावतेली समाज बोर्डिंग चामोर्शी यांच्याकडून पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ देऊन सावतेली समाज भवन येथे सत्कार करण्यात आला.

यावेळी गजानन भांडेकर यांनी भारतीय जनता पार्टी हा राष्ट्रीय पक्ष असून, आपल्या समाजातील एक प्राध्यापक व्यक्तीची भाजप जिल्हाध्यक्षपदी पदावर निवड झाली, हे आम्हास गौरवशाली आहे, असे सांगितले. शीला वैरागडे यांनी प्रा. रमेश बारसागडे यांना समाजकार्य करताना ईश्वर द्विगुणित शक्ती प्रदान करो व त्यांचा उत्साह नेहमी वाढत राहावे, अशी शुभकामना दिली. तर सावतेली समाज बोर्डिंगचे अध्यक्ष दादाजी बारसागडे यांनी प्रा. रमेश बारसागडे हे शालेय जीवनापासूनच त्यांना समाजासाठी काही तरी करावे, अशी त्यांची वृत्ती होती. आज एक सामान्य कुटुंबातील सामान्य व्यक्ती जिल्हाध्याक्षपदी निवड होणे हे आपल्या समाजासाठी भूषनीय आहे, असे प्रतिपादन केले. प्रा. रमेश बारसागडे यांनी माझ्यासारख्या सर्वसाधारण कुटुंबातील व्यक्तीवर जिल्हाध्यक्ष म्हणून भारतीय जनता पार्टीने विश्वास दाखविला.

